# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ९ जुलै, २०१८

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्री. भैय्यासाहेब ऊर्फ चंद्रकांत रामचंद्र ठाकूर, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**वने मंत्री** : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ४)**

(१) **सर्वश्री. अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, त्र्यंबकराव भिसे, ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील निम्म्याहून अधिक खाद्य व्यावसायिक विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या सुमारास निदर्शनास येणे, परवाना आणि नोंदणीशिवाय सुरु असलेल्या या व्यावसायिकांवर कोणतीही कारवाई केली जात नसणे, १६०० प्रकरणांपैकी १०५७ प्रकरणात आवश्यक दस्तऐवज सादर करण्यात आले नसतानाही अन्न व औषध प्रशासनाकडून खाद्य व्यावसायिकांना परवाने जारी केल्याचा

ठपका महालेखापालांनी अन्न व औषध प्रशासनावर ठेवणे, राज्यात १६.८६ लाख खाद्य व्यावसायिकांपैकी फक्त ९.४३ लाख खाद्य व्यावसायिकांनी माहे जून, २०१६ पर्यंत नोंदणी केलेली असणे, उर्वरित ७.४३ लाख खाद्य व्यावसायिक नोंदणी आणि परवान्याशिवाय व्यवसाय करीत असल्याचे महालेखापालांनी आपल्या अहवालात नमूद केल्याचे निदर्शनास येणे, नोंदणी आणि परवान्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज केला नसल्यास असे परवाने मुदतबाह्य ठरले जात असणे, अशा व्यावसायिकांनी त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी नव्याने अर्ज करुन नोंदणी परवाना घेणे आवश्यक असणे, विनापरवाना सुरु असलेल्या खाद्य विक्रेत्यांवर शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. मनोहर भोईर, सुनिल प्रभू, अजय चौधरी, शशिकांत शिंदे, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, संदीप नाईक, जयदत्त क्षीरसागर, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, श्री. राहुल जगताप, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री प्रदीप जाधव-नाईक, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, दत्तात्रय भरणे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव-पाटील, विजय भांबळे, भाऊसाहेब पाटील -चिकटगांवकर, संग्राम जगताप, सुरेश लाड, राहुल मोटे, संजय कदम, हनुमंत डोळस, दिपक चव्हाण, पंकज भुजबळ, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, बाळासाहेब थोरात, ॲड. यशोमती ठाकूर, श्रीमती निर्मला गावित, श्री डी.पी.सावंत, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, अब्दुल सत्तार, हर्षवर्धन सपकाळ, मो.आरिफ नसीम खान, अमित देशमुख, अमिन पटेल, त्र्यंबकराव भिसे, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. अस्लम शेख, संग्राम थोपटे, राहुल बोंद्रे, भारत भालके, ॲड.राहुल कुल, सर्वश्री नारायण पाटील, पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, शेख आसिफ शेख रशीद, जयकुमार गोरे, बसवराज पाटील, श्रीमती अमिता चव्हाण, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. अमित झनक, मधुकरराव चव्हाण, वसंतराव चव्हाण, विश्वजित कदम, मंगेश कुडाळकर, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री.सुरेश धानोरकर, किसन कथोरे, संजय केळकर, बळीराम सिरसकार, नरेंद्र पवार, सुनिल शिंदे, बाळासाहेब पाटील, सुरेश गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे दुग्ध विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील दुध उत्पादकांनी व शेतकऱ्यांनी हजारो लिटर दुध रस्त्यावर ओतून १० दिवसांच्या गाव बंद आंदोलनास दिनांक ०१ जून, २०१८ पासून केलेली सुरुवात, राज्यात दररोज ४० लाख लीटर दुधाचे अतिरिक्त उत्पादन होत असून देशाच्या एकूण २ लाख टन उत्पादनापैकी राज्यात ३० हजार टन दुध पावडर गोदामात पडून असणे, यामुळे दुध उत्पादक शेतकरी मोठया प्रमाणात आर्थिक संकटात सापडणे, राज्यभरात संकलित होणाऱ्या एकूण १ कोटी ३० लाख लीटर दुधापैकी ४० लाख लीटर दुधाची दुध पावडर बनविण्यात येणे, शासनाने दुध पावडरला ३ रुपये अनुदान देऊनही सदरहू प्रश्न मार्गी न

लागणे, उर्वरित ९० लाख लीटर दुधाबाबत कोणतीही ठोस पाऊले उचलून शासनाने कार्यवाही न केल्याने ग्राहक जनता दुधासाठी प्रति लीटर मागे ४२ रुपये मोजत असताना शेतकऱ्यांना मात्र त्यातील फक्त १७ रुपये प्राप्त होणे, उर्वरित २५ रुपये प्रक्रिया व वितरणामध्ये नफेखोरी करण्यात येणे, कृषी विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार गाईच्या दुधाचा प्रति लीटर उत्पादन खर्च ३५ रुपये असून एसएनएफच्या दुधाला २७ रुपये भाव शासनाने जाहीर करणे, उत्पादन खर्चाच्या तुलनेत लीटर मागे १८ रुपये तोटा होत असून हमी भावाच्या तुलनेत लीटर मागे शेतकऱ्याची १० रुपयाप्रमाणे आर्थिक लूट सुरु असणे, राज्यातील ५८.५ टक्के दुध खासगी डेअरी उद्योगामार्फत संकलित होत असून यावर नियंत्रण असणारा कायदाच अस्तित्वात नसल्याने शासन हतबल ठरत असणे, बाजार ताब्यात ठेवण्यासाठी व नाममुद्रा विकसित करण्यासाठी सुरु असलेल्या स्पर्धेमुळे बहुसंख्य दुध संघांनी घाऊक विक्रेते, वितरक व किरकोळ विक्रेते यांच्या नफ्यात भरमसाठ केलेली वाढ वितरण साखळीतील ही लूट थांबविण्यासाठी व दुध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने अधिनियम व नियमात सुधारणा करुन त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याची तसेच कर्नाटक शासनाप्रमाणे प्रति लिटर ५ रुपये दूध भुकटीसाठी अनुदान देण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. सुनिल प्रभू, अबु आझमी, सुनिल शिंदे, ॲड. भीमराव धोंडे, श्री. संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात दिनांक २६ मे, २०१८ रोजी जाहीर झालेल्या सीबीएसईसीच्या निकालात ९० टक्केपेक्षा गुण मिळणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण सुमारे ५ टक्क्यांनी तसेच ९५ टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३ टक्क्यांने वाढल्याने सेल्फ फायनान्स अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवताना राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना सीबीएसईसीच्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करावी लागणार असणे, त्यातच गत ५ वर्षामध्ये बारावीची परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढत असणे, सीबीएसईसी शाळांमध्ये गुण मिळण्याचे प्रमाण जास्त असल्याने या विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयात चांगल्या अभ्यासक्रमासाठी सहज प्रवेश उपलब्ध होणे, परंतू राज्य मंडळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्ता व चांगले गुण असतानाही प्रवेशासाठी चांगल्या महाविद्यालयांना मुकावे लागणे, यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय, या संदर्भात अकरावी प्रमाणेच पदवीच्या प्रथम वर्षासाठीही गुणसमानता सुत्र वापरुन महाविद्यालयीन प्रवेश देण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. संदीप नाईक, शशिकांत शिंदे, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत**

**पाटील, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, जयदत्त क्षीरसागर, हसन मुश्रीफ, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, श्री. राहुल जगताप, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री. प्रदीप जाधव-नाईक, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, दत्तात्रय भरणे, मकरंद जाधव-पाटील, नरहरी झिरवाळ, विजय भांबळे, भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर, संग्राम जगताप, सुरेश लाड, राहुल मोटे, संजय कदम, हनुमंत डोळस, दिपक चव्हाण, पंकज भुजबळ, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. बाळासाहेब पाटील, अबु आझमी, ॲड.राहुल कुल, श्री. सुरेश गोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"केंद्र व राज्य शासनाने "डिजिटल इंडिया" ची योजना आखली असली तरी राज्यातील १३ हजार ८४४ शाळांमध्ये अद्यापपर्यंत वीजच पोचली नसून तब्बल ४४ हजार ३३० शाळातील विद्यार्थ्यांना संगणक म्हणजे काय याचा गंधही नसल्याचे नुकतेच उघडकीस येणे, "युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन" या संस्थेने दिलेल्या अहवालातील वास्तवामुळे राज्याच्या शालेय शिक्षण विभागात खळबळ उडणे, यंदाच्या वर्षात वीज नसलेल्या आणखी ७४२ शाळांची भर पडल्याची माहिती या संस्थेच्या अहवालातून दिसून येणे, दरम्यान कोट्यवधी रुपये खर्चुनही हजारो विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित राहिल्याने नागरीकांत विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”

**पाच : सन २०१८-२०१९ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस).**

(१) महसूल व वन विभाग.

(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(४) सार्वजनिक बांधकाम विभाग.

(५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) महसूल मंत्र्यांचा प्रस्ताव (म.वि.स. नियम १५४ अन्वये) :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

---

**(ब) सहकार मंत्र्यांचा प्रस्ताव (म.वि.स. नियम १५४ अन्वये) :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मिळावी."

---

**(क) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ – दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.

---

**(ड) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदिप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री.जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदीप जाधव (नाईक), राजेश टोपे, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, कुणाल पाटील, डी.पी.सावंत, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ – महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदीप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदीप जाधव (नाईक), राजेश टोपे, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री दिलीप वळसे पाटील, अजित पवार, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंतराव चव्हाण, शेख

आसिफ शेख रशीद, अमिन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबु आझमी, पृथ्वीराज चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, हर्षवर्धन सपकाळ, सुरेश लाड, हनुमंत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदीप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदीप जाधव (नाईक), राजेश टोपे, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, अमिन पटेल, वसंतराव चव्हाण, शेख आसिफ शेख रशीद, राधाकृष्ण

विखे पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ – महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र अनुसूचित जाती,

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री.दिलीप वळसे पाटील, अजित पवार, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री.अमित झनक, डी.पी.सावंत, भारत भालके, वसंत चव्हाण, आसीफ शेख, रशीद शेख, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे पाटील, अबू आसिम आजमी, पृथ्वीराज चव्हाण, सुरेश लाड, हनुमत डोळस, भास्कर जाधव, संजय कदम, दत्तात्रय भरणे, पांडुरंग बरोरा, नरहरी झिरवाळ, संदिप नाईक, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, शशिकांत शिंदे, राहुल जगताप, दिपक चव्हाण, डॉ.सतीश पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड, सर्वश्री.वैभव पिचड, विजय भांबळे, प्रदिप नाईक, राजेश टोपे, जयंत पाटील, छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, डी.पी.सावंत, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री वसंतराव चव्हाण, बसवराज पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अबु आझमी, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री छगन भुजबळ, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२

सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, गणपतराव देशमुख, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, अबु आझमी, मो. आरिफ नसिम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ.सतिश पाटील, सर्वश्री.अमिन पटेल, डी. एस. अहिरे, राहुल मोटे, डी.पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, जे.पी.गावीत, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, अमर काळे, अमित झनक, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री. भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री. अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार**

**गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, संग्राम जगताप, विश्वजीत कदम, डॉ.मधुसूदन केंद्रे, श्री.नरहरी झिरवाळ वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात मोठया प्रमाणात तूरीचे उत्पादन होऊनही पणन महासंघाने ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून तूर, हरभरा खरेदी न करणे, नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करुन व्यापाऱ्यांनी केलेली शेतकऱ्यांची लूट, ऑनलाईन नोंदणी न करता तूर व मक्याची खरेदी पणन महासंघाने करूनही चुकारे प्रलंबित असणे, बाहेरील देशातून तूरडाळ व हरभरा आयात केल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांकडील जवळपास २४ लाख ५१ हजार ८२४ क्विंटल तूर व हरभरा खरेदीअभावी शिल्लक असणे, खरेदी-विक्री संचालकांवर चुकीचे गुन्हे नोंदविणे, छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना ३४ हजार कोटींची जाहीर केलेली कर्जमाफी तथापि, प्रत्यक्षात केवळ १५ हजार कोटीचीच कर्जमाफी मिळणे, परिणामी शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा न होणे, शासनाच्या धोरणामुळेच राज्यात गेल्या साडेतीन वर्षाच्या काळात १७ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग पत्करणे, केंद्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी निधी देण्यास दिलेला नकार, राज्यात सहकारी बँकांची अडवणूक केल्यामुळे पीक कर्जवाटप करण्यास जिल्हा बँकांना येत असलेल्या अडचणी, वन टाईम सेटलमेंटसाठी शेतकरी तयार असताना अनेक जिल्ह्यामध्ये पात्र शेतकऱ्यांच्या याद्या अद्यापही न आल्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जवाटप न करता ऊसाच्या बिलातून कर्जाच्या रकमा वळत्या करुन घेणे, आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते कर्जमाफीचे प्रमाणपत्र देऊनही पीक कर्जासाठी हेलपाटे मारावे लागणे, बुलढाणा व यवतमाळ जिल्ह्यात पीक कर्ज मंजुरीसाठी शेतकऱ्याच्या पत्नीकडे शरीरसुखाची मागणी होणे, डीजीटल स्वाक्षरी व ऑनलाईन ७/१२ योजना यशस्वी न होणे, आपल्या मागण्यांसाठी शांततेने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, चालू वर्षी अमरावती जिल्ह्यात बनावट बियाणे वितरीत झाल्याच्या उघडकीस आलेल्या घटना, पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत सन २०१७ च्या खरीप हंगामातील ९२ टक्के शेतकऱ्यांच्या बँक खात्याची माहिती बँकेतील खात्याशी जुळत असतानाही ४१.५० लाख विमाधारक शेतकऱ्यांना मदत नाकारुन एकूण २,२६९ कोटींच्या नुकसान भरपाईपैकी फक्त ७४७ कोटीचे वाटप करणे, कापसावरील बोंड अळीमुळे झालेले सुमारे ३००० कोटींचे नुकसान तसेच मावा व तुडतुड्यामुळे झालेली धानाची नुकसान भरपाई जाहीर करून अद्यापही न मिळणे, धर्मा पाटलाच्या मुलाला दिलेल्या आश्वासनाला फासलेला हरताळ, साखरेच्या दरात घसरण झाल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर वाढत चाललेली थकबाकी, त्यात पाकिस्तानातून साखर, तूर व काद्यांची आयात करुन राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणीमध्ये झालेली वाढ, कापसावर फवारणी करताना मृत झालेल्या शेतकऱ्यास मदत, दृष्टीहीन व अपंग शेतकऱ्यांना पीक कर्ज, आधारभूत किंमती, हमीभाव, वन हक्क कायदा तसेच सामाजिक योजनांची अंमलबजावणी करणे इ. मागण्याबाबत शासनाने दि. १३ मार्च, २०१८ रोजी सभागृहात

दिलेल्या आश्वासनानुसार कोणतीच कार्यवाही न होणे, माहे मार्च, २०१७ पर्यंतच्या पेड-पेंडिंग ग्राहकांना विजेची जोडणी देण्याचे शासनाने सभागृहात मान्य करुनही अद्याप जोडणी न मिळणे, परिणामी ग्रामीण भागात दिवसभरातून अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होणे, पुरेशा पायाभूत सुविधा नसल्याने ग्राहकांची गैरसोय होणे, ग्राम विद्युत सहाय्यक नियुक्तीबाबत दीड वर्षापूर्वी शासन निर्णय निर्गमित करून अद्यापही नियुक्त्या न करणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना, कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ७ जुलै, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.